# तोरण

अंक ८६ ऑक्टोबर २०१० – मार्च २०११

संपादकीय

महिलांना मतदानाचा हक्क मिळवून देणारी स्त्री

तुम्हाला हे माहित आहे का?

अन्नावर नियंत्रण व अधिकार

एन्डोसल्फान – शेतकऱ्यांचा मित्र की शत्रू?

पाककला स्पर्धा – खरवते

पशु अनुवंशिक साधनसंपत्ती

अंतरातील घडामोडी

**संपादकीय**

आज महिलांना राजकारण, नोकरी, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य अशा अनेक विविध क्षेत्रांमध्ये स्थान आहे. परंतु काही वर्षांपूर्वी अशी परिस्थिती नव्हती. मतदान करणे व आपले नेते निवडणे हा हक्क आपल्याला सहजासहजी मिळालेला नाही. जर्मनीच्या क्लॅरा झेटकीनसारख्या महिलेला हा हक्क मिळवण्याकरता संघर्ष करावा लागला होता.

**डॉ. नित्या घोटगे**
अंतरा, संचालिका

**देणगी मूल्य : रु. ५/–**

# महिलांना मतदानाचा हक्क मिळवून देणारी स्त्री

क्लॅरा झेटकीन हिचा जन्म ५ जुलै १८५७ला जर्मनीमध्ये झाला व तिचा मृत्यु १९३३ साली रशियामध्ये झाला. ती कम्युनिस्ट व राजकीय कार्यकर्ती होती पण त्याचबरोबर ती महिलांच्या अधिकाराकरता जीव तोडून मोहीम लढवण्याकरताही सक्रीय होती. ८ मार्च १९११ ला पहिला महिला दिवस घडवून आणण्यातसुध्दा तिचा हातभार होता.

लेपझीग टीचर्स कॉलेज फॉर विमेन या संस्थेतून क्लॅरा झेटकीन हिने शिक्षक होण्याचे शिक्षण घेतले. तिचा अभ्यास चालू असताना ती महिला व श्रमिक चळवळीत सहभागी झाली. १८७८ मध्ये जर्मनीतल्या सोशल डेमोक्रॅटीक पार्टीची ती सभासद झाली. परंतु बिसमार्क या १९व्या सतकातल्या जर्मन मुत्सद्द्याने घातलेल्या बंदीमुळे, जेटकीनने स्वेच्छेनेच स्वत:वर हद्दपारी लादली व ती १८८० च्या दशकात जुरीक व पॅरीसमध्ये जाऊन राहिली.

१८९१ ते १९१७ या दरम्यान ती खास महिलांकरता असलेल्या समानतेवरच्या जर्मन मासिकाची संपादक म्हणून काम पहात असे. तिला पहिल्यापासूनच महिलांच्या राजकारणात रस होता. १९०७ मध्ये ती सोशल डेमोक्रॅटीक पार्टीच्या नवीनच सुरू झालेल्या महिलांच्या कार्यालयाची मुख्य बनली. काही समाजवाद्यांना महिलांची मताकरताची मागणी श्रमिक चळवळी मध्ये विनाकारण फूट पाडणारी आहे असे वाटत होते. परंतु झेटकीन व रशियन महिला अलेक्झांड्रा कोलोंटाइ यांच्यासारख्या इतरांनी यशस्वी लढा देऊन समाजवादी कार्यक्रमाचा आवश्यक भाग म्हणून त्याला मान्यता मिळवून दिली.

१९१० मध्ये कोपनहेगनमध्ये भरलेल्या दुसऱ्या जागतिक श्रमिक महिला परिषदेवेळी झेटकीनने परिषदेपुढे मांडल्याप्रमाणे एक जागतिक महिला दिवस असावा असे ठरवण्यात आले. ह्या वेळेस एक नक्की तारीख ठरलेली नव्हती.

झेटकीन लेनीनची व जर्मन क्रांतीकारी लेखिका रोझा लक्झमबर्ग यांची व्यक्तिगत मैत्रिण होती. पहिल्या महयुध्दाच्या काळात १९१५ साली स्वित्झरलँडमध्ये बर्न येथे झेटकीनने पहिल्या जागतिक महिला परिषदेचे आयोजन केले. शेवटपर्यंत तिचा राजकारणात सक्रीय सहभाग होता.

•••

## तुम्हाला हे माहित आहे का?

### पहिला जागतिक महिला दिन

ब्रिटीश खासदार जॉन स्टुअर्ट मिल ही संसदेमध्ये १८६९ मध्ये महिलांच्या मतदान करण्याच्या अधिकाराची मागणी करणारी पहिली व्यक्ती होती.

१९ सप्टेम्बर १८९३ला महिलांना मतदान करण्याचा अधिकार देणारा न्युझीलंड हा पहिला देश आहे.

१९१० मध्ये कोपनहेगन, डेन्मार्क, इथे दुसरी जागतिक श्रमिक महिला परिषद भरली होती त्यावेळी क्लॅरा झेटकीन ह्या जर्मन महिलेने, महिलांच्या मागण्यांचा पाठपुरावा करण्याकरता, दर वर्षी एकाच दिवशी सगळ्या देशातून महिला दिन साजरा करण्यात यावा ही कल्पना पुढे मांडली. यावेळी १७ देशातून आलेल्या १०० महिला प्रतिनिधींनी ह्या कल्पनेला एकमताने पाठिंबा दिला व त्याचे निष्पन्न म्हणजे जागतिक महिला दिवस.

क्लॅरा झेटकीन हिने पहिल्या जागतिक महिला दिवसाकरता १९ मार्च ही तारीख निवडली कारण तो १८४८च्या क्रांतीचा दिवस होता.

१९११ मधल्या पहिल्या जागतिक महिला दिवसाला अपेक्षेबाहेर यश मिळाले. लहान लहान गावातूनसुध्दा सभा आयोजित केल्या होत्या व तिथल्या हॉलमध्ये एवढी दाटी झाली की पुरूष श्रमिकांना महिलांना जागा देण्यास सांगण्यात आले. अपवाद म्हणून पुरूष मुलांना सांभाळायला घरी थांबले होते व त्यांच्या घरात बंदिस्त असणाऱ्या बायका सभेला गेल्या होत्या.

१९१३ मध्ये जागतिक महिला दिवसाची तारीख बदलून ८ मार्च हा दिवस पक्का केला गेला. संयुक्त राष्ट्रांनी १९७५ मध्ये ह्या दिनाला मान्यता दिली.

...

*महाराष्ट्रात गावची सर्वसाधारण सभा भरण्याअगोदर एक दिवस महिलांची ग्राम सभा होणे हे कायद्याने बंधनकारक आहे. साधारणपणे, पुरूषांसमोर महिला फारशा बोलत नाहीत म्हणून महिलांनी एक दिवस आधी सभा घेऊन, आपापसात विचार करून आपल्या समस्या सर्वसाधारण सभेसमोर मांडाव्यात हा त्यामागचा उद्देश आहे.*

# अन्नावर नियंत्रण व अधिकार

अनेक वर्षे भारताकडे कृषी प्रधान देश म्हणूनच पाहिले गेले आहे. परंतु, वाढत्या प्रमाणावर लोक स्वतःकरता अन्न पिकवण्याऐवजी ते विकत घेण्याकरता बाजारावर अवलंबून असतात. बियाणे, खते, बाजारपेठा इत्यादी पुरवण्याकरता कंपन्यां पुढे आल्यामुळे, शेकतऱ्यांचे त्यांच्या जमिनीवरचे व शेतीवरचे नियंत्रण कमी होत चालले आहे. श्रीमंत शतेकऱ्यांना ह्यापासून फारशी भिती नाही पण लहान शेतकऱ्यांवर मात्र त्यामुळे नक्कीच गंभीर परिणाम होईल. लहान शेतकऱ्यांच्या चिंता व काळज्या विचारात घेऊन **अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना पुढे आली आहे.

फेब्रुवारी २००७ मध्ये, ८० हून अधिक देशातून शेतकरी/शेतकरी कुटुंबे, कोळीसमज, स्थानिक लोक, भूमीहीन, ग्रामीण कामगार, स्थलांतर करणारे, धनगर, वननिवासी, महिला, तरुणवर्ग, ग्राहक व पर्यावरणीय व नागरी चळवळीतले ५०० प्रतिनिधी माली देशातल्या न्येलेनी गावात **अन्नावर नियंत्रण व अधिकार** ह्याकरता एक जागतिक चळवळ ताकदीने उभी करण्याकरता एकत्र आले होते. सगळयां**नी** **अन्नावर नियंत्रण व अधिकार** या संदर्भात पुढे दिलेले ६ मुख्य मुद्दे मांडले.

### १. लोकांना अन्न मिळावे यावर भर

अन्न, कृषी, पशुधन व मत्स्यउद्योगासंबंधी धोरण ठरवताना सर्व व्यक्तिंना, लोकांना, समाजांना पुरेसे, आरोग्यदायी व सांस्कृतिकदृष्ट्या योग्य अन्न मिळण्याचा हक्क राहिल ही बाब केंद्रस्थानी ठेवली जाते. यामध्ये भुकेले, परकीयांच्या ताब्यात असलेले, तणावयुक्त भागातले आणि परिघाच्या बाहेरचे अशा सर्वांचाही समावेश होतो. अन्न हा केवळ आंतरराष्ट्रीय कृषीउद्योगातला एक घटक किंवा वस्तु आहे असे म्हणणे चुकीचे आहे. सर्वांनाच **अन्नावर नियंत्रण व अधिकार** मिळायला हवा.

### २. अन्न पुरवणारांना महत्व देते

महिला व पुरुष, लहान व मध्यम शेतकरी, पशु पालक, मच्छिमार, वननिवासी, मूळचे लोक, व स्थलांतर करणारांसकट शेती व मत्स्यउद्योगातले कामगार जे अन्नाची (पीकांची) लागवड करतात, वाढवतात, कापणी करतात व त्यावर प्रक्रिया करतात या सर्वांच्या योगदानाचा **अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना आदर करते. जी धोरणे, कामे व कार्यक्रम अन्न उत्पादनात सहभागी होणाऱ्या ह्या सर्वांना कमी महत्वाचे समजतात, त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनाला धोका निर्माण करतात आणि त्यांना नष्ट करण्याचे प्रयतक करतात ती सर्व धोरणे, कामे व कार्यक्रम यांना **अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना नाकारते.

### ३. अन्न यंत्रणेचे स्थानिक पातळीवरच नियंत्रण

**अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना अन्न पुरवठा करणारांना व ग्राहकांना एकत्र आणते. अन्नासंबंधीच्या समस्यांबाबत निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अन्न पुरवठा करणारे व ग्राहक यांना केंद्रस्थानी ठेवते. स्थानिक बाजारावर अन्न पुरवणारे अन्न लादत नाहीत याकडे लक्ष देते. कमी प्रतीचे, आरोग्याला धोका निर्माण करणारे अन्न, किवा जीनात्मक बदल केलेले अन्न यांपासून ग्राहकाचे संरक्षण करते. अशाश्वत व अन्याय्य आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना देणाऱ्या व शासन करण्याच्या पध्दतीवर, यंत्रणांवर व करारांवर अवलंबून असलेल्या व दूरच्या, कुणालाही जबाबदार नसलेल्या महामंडळांना अधिकार देणाऱ्या प्रथांना विरोध करते.

### ४. स्थानिक पातळीवर नियंत्रण

**अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना प्रदेश, जमीन, चराई, पाणी, बियाणे, पशुधन व माशांची संख्या याबाबतचे नियंत्रण स्थानिक अन्न पुरवठा करणारांवर सोपवते व त्यांचे हक्क मान्य करते. विविधता टिकून राहिल अशा समाजाच्या व पर्यावरणाच्या दृष्टीने शाश्वत पध्दतीने ही संसाधने ते वाटून घेऊन वापरू शकतात. स्थानिक प्रदेश बरेच वेळा भौगोलिक राजकीय सीमांच्या पलिकडे जातात व स्थानिक जमातींचा तिथे वस्ती करण्याचा, त्यांच्या प्रदेशांचा वापर करण्याच्या त्यांच्या हक्काची दखल घेतात. अंतर्गत संघर्ष किंवा स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरच्या अधिकाऱ्यांबरोबरचे मतभेद सोडवायला मदत व्हावी म्हणून वेगवेगळ्या विभागांतल्या व प्रदेशातल्या व वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या अन्न पुरवठा करणारांमध्ये सक्रीय देवाण–घेवाण व्हावी याकरता **अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना प्रयत्न करते. तसेच कायदे, व्यापारी कंत्राटे आणि आयपीआर पध्दतीद्वारे नैसर्गिक संसाधनांचे खाजगीकरण करण्याला विरोध करते.

### ५. ज्ञानाचा व कौशल्याचा विकास

स्थानिक अन्न उत्पादन व कापणीच्या पध्दती टिकवणाऱ्या, विकसित करणाऱ्या व त्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या अन्न पुरवठा करणारांच्या व त्यांच्या स्थानिक संस्थांच्या कौशल्यावर व स्थानिक ज्ञानावर, त्यांना पुष्टी देणाकरता योग्य संशोधन पध्दती विकसित करणे व हे ज्ञान पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे या सर्वांवर **अन्नावर नियंत्रण व अधिकार** आधारलेले आहे. जीनात्मक बदल करणे यासारख्या ह्या सर्वांना कमी लेखणाऱ्या, धोका निर्माण करणाऱ्या व दूषित करणाऱ्या तंत्रज्ञानाला नाकारते.

### ६. निसर्गाशी जुळवून घेणारे काम

विशेषतः हवामान बदलाला तोंड देता येईल व त्याच्याशी जुळवून घेता येण्याच्या गुणात वाढ होईल अशा विविध व कमी प्रमाणात बाहेरुन विकत घेऊन काही गोष्टींचा कमी प्रमाणात वापर असणाऱ्या शेतीमध्ये **अन्नावर नियंत्रण व अधिकार** ही संकल्पना निसर्गाच्या योगदानाचा वापर करते. आजूबाजूच्या पर्यावरणातून मिळणाऱ्या वस्तूंचा जास्तीत जास्त वापर करून सर्व परिस्थितीला तोंड देण्याची व परिस्थितीशी जुळवून घेण्याची शेतीची क्षमता वाढवते. पर्यावरणातल्या उपयुक्त कार्यांना हानी पोचेल

अशा पध्दतींना किंवा जास्त प्रमाणात उर्जा लागणाऱ्या एकपीक शेतीला व शेतीला उपयुक्त अशा जनावरांच्या उद्योगधंद्यांना, हानीकारक मासेमारी प्रथांना व इतर औद्योगिक उत्पादन पध्दतींना, पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या व जागतिक तापमान वाढवायला हातभार लावणाऱ्या पध्दतींना नाकारते.

### वेगवेगळ्या पातळ्यांवर अन्न सुरक्षा

अन्न सुरक्षा अनेक गोष्टींवर अवलंबून असते त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

### जागतिक पातळीवर

१. हवामान बदलाच्या परिणामाची तीव्रता कमी करण्याकरता व अन्न पुरवठा विस्कळित होऊ नये म्हणून अन्नधान्याचा पुरेसा साठा असावा ह्या दृष्टीने पावले उचलण्याची व त्याला तोंड देण्याची आपली क्षमता आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर अन्न वाटप करण्याची यंत्रणा कार्यरत असणे
२. नवीन तंत्रज्ञानाने ही क्षमता वाढेल आणि भोवतालच्या परिस्थितीवर होणाऱ्या अनपेक्षित परिणामामुळे मोठ्या प्रमाणावर अन्न पुरवठा विस्कळित होण्याचा धोका वाढणार नाही याची खात्री असणे

### स्थानिक व राष्ट्रीय पातळीवर

१. अन्न उत्पादन करण्याची व/किंवा लोकसंख्येनुसार गरज असेल तेवढे अन्नधान्य आयात करण्याची क्षमता टिकवून ठेवता येईल व वितरण व्यवस्था आणि देशाच्या सीमेच्या आत उत्पादन करण्याचा किंवा गरजेनुसार अन्नधान्य मिळण्याचा हक्क असावा याची खात्री असणे (उत्पादन, खरेदी किंवा विशेष योजनांमार्फत)
२. शेतकऱ्यांचा समावेश असलेले व संपूर्ण देशातले सर्व स्तरावरचे शेतकरी वापरत असलेल्या उत्पादन पध्दतीमध्ये सतत सर्वांगीण सुधारणा होत राहतील असे संशोधन व विकास कार्य सतत चालू ठेवणे
३. ग्रामीण व शहरी पातळीवरच्या रहिवाशांना उदरनिर्वाहाचे साधन मिळत राहील व त्यांना गरज असलेले उत्पादन करुन, खरेदी करून किंवा वस्तूच्या बदल्यात वस्तू या धर्तीवर अन्न मिळू शकेल याची खात्री असणे

### सामाजिक व घरगुती पातळीवर

१. अन्नधान्याचे उत्पादन करता येईल/ गरजेनुसार योग्य प्रकारे अन्नधान्य मिळवता येईल याकरता असलेली उदरनिर्वाहाची साधने सतत टिकवून ठेवण्याची क्षमता
२. गरीबीत वाढ होऊ नये याकरता स्थानिक गरजा व प्रथांना सोईची अशा धोका निवारण मार्गांचा अवलंब
३. संघर्षाचे कारण व हत्यार म्हणून अन्नाचा वापर होण्यास प्रतिबंध करणे
४. अत्यल्प जमिनी असलेल्यांना उत्पादकता वाढवण्याकरता मदत, व जर त्यांना त्या भागातून बाहेर काढले गेले तर उदरनिर्वाहाची शक्य असलेली पर्यायी साधने उपलब्ध करून देण्यास मदत
५. घरात व घराबाहेर महिला व पुरूष यांच्यात सर्व गोष्टींची समान विभागणी

•••

# एन्डोसल्फान

## शेतकऱ्यांचा मित्र की शत्रू?

**तुम्ही एन्डोसल्फान वापरणाऱ्यांपैकी एक आहात का? हे वाचून तुम्हाला काय वाटते ते तुम्हीच ठरवा.**

श्रुती, पाद्रे गाव, जि. कासारगोड, केरळ, ही ७ वर्षाची चिमुकली, जिला खूप शिकण्याची इच्छा आहे पण शाळा जवळ असूनही ती जाऊ शकत नाही कारण ती जन्मतः अपंग आहे. ती जन्मली तेव्हा तिला ३ पाय होते व आता ती फक्त एका पायावर उड्या मारत चालू शकते. तिच्या या अवस्थेला कारणीभूत आहे – एन्डोसल्फान. तिचे आईवडिल शेतमजूर असल्यामुळे कायम एन्डेसल्फानच्या सान्निध्यात असायचे व याचाच परिणाम म्हणजे श्रुतीला आलेले हे अपंगत्व!

अशीच आणखीही काही उदाहरणे आहेत.

- अविनाश – वय १० वर्षे, याला मेंदूचा आजार, दमा व फेपरे हे आजार आहेत.
  वडिलांचा व्यवसाय – शेतमजूर
- नारायण नाईक – वय २० वर्षे 'त्वचेचे आजार, मानसिक व शारिरीक वाढ खुंटलेली, उंची ३ फूट'
  वडिलांचा व्यवसाय – शेतमजूर
- रेवंथी नाईक – वय १४ वर्षे, नारायण नाईक यांची बहिण, हिला फेपरे
  वडिलांचा व्यवसाय – शेतमजूर

अशी अनेक लहान मुले व माणसे एन्डोसल्फानच्या दुष्परिणामाला बळी पडली आहेत कारण आजही गावात एन्डोसल्फानचा सर्रास वापर होतो.




**काय आहे हे एन्डोसल्फान?**

एन्डोसल्फान हे एक रासायनिक कीटकनाशक आहे जे आपल्या अतितीव्र विषारी परिणामांमुळे प्रकाशझोतात आले आहे. या रासायनिक कीटकनाशकावर ६३ देशांतून बंदी घालण्यात आली आहे. या देशांमध्ये युरोप, ऑस्ट्रेलिया, न्युझीलँड आणि अशिया व पश्चिम आफ्रिकेतील काही देशांचा समावेश आहे. अमेरिका व ब्राझीलमध्ये एन्डोसल्फानचा वापर हळूहळू बंद होत चालला आहे. परंतु, भारत व इतर काही देशांमध्ये या कीटकनाशकाचा अजूनही अतिप्रमाणात वापर सुरू आहे.

एन्डोसल्फान ह्या रासायनिक कीटक–नाशकाचा वापर फळ झाडांवर, भाजीपाल्यावर कीडनियंत्रक म्हणून केला जातो. त्याचा परिणाम इतका प्रभावी आहे की किडींना तर ते मारतेच पण शेतीला उपयोगी अशा उपयुक्त कीटकांनाही ते आपली शिकार बनवते. बाजारात उपलब्ध असलेल्या सर्व कीटकनाशकांमध्ये एन्डोसल्फान हे सर्वात घातक कीटकनाशक समजले जाते.

याशिवाय एन्डोसल्फानच्या संपर्कात येणाऱ्या माणसांना व प्राण्यांनासुध्दा ह्या कीटकनाशकाचा संसर्ग होऊ शकतो. एन्डोसल्फानचा संसर्ग होण्याचे मार्ग खालीलप्रमाणे आहेत –

- फवारणी करते वेळी पोट, फुफ्फुस व

त्वचेमार्गे शोषून घेतले जाऊन

- फवारणी झालेल्या ठिकाणच्या हवेमधून
- एन्डोसल्फान दूषित पाणी प्यायल्यामुळे
- एन्डोसल्फानची फवारणी केलेल्या भाज्या व फळे खाल्ल्यामुळे
- एन्डोसल्फान दूषित मातीला स्पर्श केल्यामुळे
- एन्डोसल्फान तयार करणाऱ्या कारखान्यात काम केल्यामुळे

कोणत्याही मार्गाने झालेला संसर्ग घातकच असतो.

ह्या कीटकनाशकामुळे जनावरांच्या व माणसांच्या शारिरीक वाढीवर, मज्जासंस्थेवर व प्रजनन संस्थेवर दुषपरिणाम होऊ शकतो. काही वेळा अगदी कमीत कमी संसर्गसुध्दा माणसाला जीवघेणा ठरु शकतो व काही वेळा मेंदूला कायमची इजा पोहोचवू शकतो. हे कीटकनाशक सतत हाताळल्यामुळे शेतकऱ्यांना त्वचेचे आजार संभवतात.




एन्डोसल्फानच्या वापरामुळे कॅन्सर होण्याच्या शक्यतेवरसुध्दा वाद सुरू आहेत.

एन्डोसल्फानचा संसर्ग झाल्याची काही लक्षणे म्हणजे अस्वस्थपणा, थरथरणे, झटके येणे, लटपटणे, मळमळणे, उलट्याजुलाब होणे, नजर अंधुक होणे, बेशुध्दी ही आहेत.

हे सर्व वाचल्यावर आता तुम्हीच ठरवा. एन्डोसल्फान हा शेतकऱ्यांचा मित्र की शत्रू?

**नम्रता जाधव** **माधुरी देशमुख**

...

## पाककला स्पर्धा, खरवते

रत्नागिरी जिल्ह्यातील खरवते, या गावी अंतरा संस्थेतर्फे दि. १ मार्च २०११ रोजी पारंपरिक पदार्थ वापरून पाककला स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये एकूण ३३ महिलांनी भाग घेतला होता. सर्वांनी तिखट, गोड असो विविध प्रकारचे पदार्थ करून आणले होते. एका महिलेने करवंदाचे चवदार लोणचेही करून आणले होते. गोड व तिखट पदार्थांमधून प्रत्येकी तीन पदार्थ निवडून खालीलप्रमाणे क्रमांक देण्यात आले.



**गोड पदार्थ**

**प्रथम क्रमांक – वंदना विलास ढालकर**

**केळी फ्रूट नाचणी व तिखट इडली**

**कृती** – आधी नाचणीचे सत्व, पीठीसाखर, इलायची पावडर व थोडा रवा टाकून पीठ तयार करुन घ्यावे. नंतर खायच्या वेळेस केळीचे लांब काप करून ह्या पीठात घोळवायचे व खायचे.

**दुसरा क्रमांक – रेशमी गुरव**

**नाचणी वड्या**

**कृती** – 'नाचणीचे पीठ तूपावर खमंग भाजून,

साखरेच्या पाकात टाकून हलवावे. चवीपुरते किंचित मीठ टाकावे. इलायची पावडर टाकून, मिश्रण घट्ट झाल्यावर तुपाचा हात लावलेल्या ताटात ओतून वड्या पाडाव्या.

**तिसरा क्रमांक –** प्रिती अनिल सागवेकर

**खोबरे काजू वड्या**

कृती – खोबरे किसून भाजावे. साखरेचा पाक करुन त्यात खोबरे टाकावे. मिश्रण घट्ट झाल्यावर तुपाचा हात लावलेल्या ताटात ओतून वड्या पाडाव्या. वरुन काजूचे काप लावावे.



**तिखट पदार्थ**

**प्रथम क्रमांक – प्रेरणा परशुराम मांडवकर**

**फणसाची भाजी**

**कृती** – फणस कापून घेणे, खोबरे भाजून घेणे. कांदा बारीक चिरून तेलावर परतणे. लसूण, मिरची, कांदा व खोबरे वाटून घेतले. भाजीमध्ये



वाटलेला मसाला, मीठ व थोडा गरम मसाला टाकला.

**दुसरा क्रमांक – राजश्री राजन जोशी**

**जास्वंदीच्या पानाचे धिरडे**

**कृती** – बेसन व तांदळाच्या पीठात जास्वंदीची कोवळी पाने बारीक चिरून टाकली. नंतर आलं, लसूण, मीठ, हळद, तिखट घालून धिरड्यासारखे पीठ भिजवून धिरडी केली.



**तिसरा क्रमांक – प्रतिक्षा प्रभाकर चौगुले**

**मुळ्याच्या शेंगांची भाजी**

**कृती** – शेंगा बारीक चिरून घेतल्या. कांदा व मिरची बारीक चिरून फोडणीत परतून घेऊन त्यावर भाजी टाकून शिजवली. चवीप्रमाणे मीठ टाकले.

स्पर्धा सुरू होण्याआगोदर सुरेखा पात्रे, प्रमुख पाहुण्या व गावचे सरपंच यांनी अंतरा संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. तसेच पारंपरिक पदार्थांचे व पौष्टिक आहाराचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला पाहुण्यांचा नारळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शेवटी सर्व सहभागी महिलांना प्रमाणपत्रे व विजेत्यांना ट्रॉफी देण्यात आली.

•••

# पशु अनुवंशिक साधनसंपत्ती

एफ.ए.ओ.च्या म्हणण्यानुसार दर महिन्याला पशुंची एक जात नाहीशी होत असते व हे प्रमाण लक्षात घेता जवळ जवळ २०% जाती नाहीशा होण्याच्या मार्गावर आहेत. एफ.ए.ओ.च्या शेतीतील जनावरांच्या संदर्भातल्या माहिती संकलनानुसार ७६०० वर जनावरांच्या जाती आहेत त्यापैकी गेल्या १५ वर्षात १९० जाती नष्ट झाल्या आहेत व आणखी १५०० नष्ट होण्याचा धोका संभवतो.

जगातील पशु अनुवंशिक साधनसंपत्तीच्या परिस्थितीसंबंधीच्या प्रारुप अहवालानुसार, गेल्या ५ वर्षात गायीम्हशी, शेळ्या, डुकरे, घोडे व कोंबड्या यांच्या जवळजवळ ६० जाती नाहीशा झाल्या आहेत. हा अहवाल म्हणजे संपूर्ण जगातील पशु अनुवंशिक साधनसंपत्तीचा व प्रत्येक देशाची त्यांचे शाश्वतरित्या व्यवस्थापन करण्याची क्षमता काय आहे याचा अंदाज घेणारा पहिलाच प्रयत्न आहे.

### जागतिकीकरण

जगभरातल्या शंभर कोटी लोकांचे पशुपालन हे उदरनिर्वाहाचे साधन आहे. जगातली जवळ जवळ ७० टक्के गरीब ग्रामीण जनता त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनातला महत्वाचा घटक म्हणून पशुपालनावर अवलंबून आहे. सध्या विकसनशील देशांमध्ये एकूण देशांतर्गत उत्पन्नामध्ये जवळ जवळ ३० टक्के उत्पन्नाकरता पशुपालन जबाबदार आहे. २०३० पर्यंत हा आंकडा ४० टक्क्यानी वाढेल असा अंदाज आहे.

एफ.ए.ओ. नुसार पशुधनाच्या बाजाराचे जागतिकीकरण हे शेतीतील जनावरांच्या जातींच्या विविधतेवर परिणाम करणारे सर्वात मोठे एकमेव कारण आहे. पारंपरिक उत्पादन पध्दतीमध्ये अनेक प्रकारची उत्पादने व सेवा पुरवणाऱ्या बहुउद्देशीय जनावरांची गरज असते. याउलट आधुनिक शेती पध्दतीने विशिष्ट गुण असलेल्या पशुंच्या जाती विकसित केल्या आहेत. उत्पादन जास्तीत जास्त मिळावे व उत्पादकतेमध्ये लक्षणीय वाढ व्हावी याकरता लागणारे विशेष गुण यांचा विकास साध्य केला पण याकरता बाहेरुन आणाव्या गोष्टीवर सर्वस्वी अवलंबून राहावे लागले. उदा. संकरित गाय (जर्सी, होलस्टाईन), पोल्ट्री फार्ममधल्या कोंबड्यांच्या जाती.

सस्तन प्राणी व पक्षी यांच्या पाळीव जातीपैकी केवळ ३० जाती पशुंपासून मानवांना मिळणाऱ्या अन्नापैकी ९० टक्के अन्न पुरवतात. एफ.ए.ओ.च्या पशु उत्पादन सेवेच्या प्रमुख आयरिन हॉफमन यांच्या म्हणण्यानुसार गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या, डुकरे व कोंबड्या या पाच जाती सर्वात जास्त अन्न पुरवठा करतात.

अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची निवड त्यांच्या उत्पादक गुणांवर केंद्रित असते व त्यांच्या कामाच्या दृष्टीने उपयुक्ततेशी व परिस्थितीशी जूळवून घेण्याच्या गुणांच्या महत्वाकडे कमी लक्ष दिले जाते. ह्या प्रक्रियेमध्ये व्यापारी दृष्टीने यशस्वी असलेल्या पशुंच्या जातींचा अनुवंशिक

किंवा जीनात्मक पाया कमी कमी होत जातो व बाजाराच्या मागणीनुसार उरलेल्या इतर जाती दुर्लक्षिल्या जातात.

### विविधता टिकवून ठेवणे

भविष्यातल्या अन्न सुरक्षिततेच्या व कृषी विकासाच्या दृष्टीने, विशेषतः कठीण नैसर्गिक परिस्थितीमध्ये, अस्तित्वात असलेल्या पशु अनुवंशिकतेच्या साठ्यामध्ये मौल्यवान साधनसंपत्ती आहे. पशु अनुवंशिक विविधता टिकवून ठेवली तर हवामान बदल, रोग व बदलती सामाजिक-राजकीय परिस्थिती अशा नवीन उद्‌भवणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्याकरता पुढील पिढ्यांना जनावरांची निवड करणे किंवा नवीन जातींचा विकास करणे या गोष्टी सोप्या जातील.

...

## अंतरातील घडामोडी

- ४ ते १३ ऑक्टोबर दरम्यान प्राग, चेक रिपब्लिक, येथे आयोजित केलेल्या इको फेअ्र ट्रेड डायलॉग या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत अंतराच्या डॉ. नित्या घोटगे व डॉ. सागरी रामदास यांचा सहभाग
- फाउंडेशन फॉर इकॉलॉजिकल सिक्युरिटी, सेंटर फॉर इकॉलॉजी व इंडियन इंस्टिट्यूट फॉर ॲडव्हासड स्टडीज यांनी Common Property Resource Institutions, Pastoral Production Systems and Green Revolution in Transition: from conflicts to convergence या विषयावर जानेवारी २०११ मध्ये होणाऱ्या जागतिक कार्यशाळेच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत १-२ नोव्हेम्बर २०१० ला सिमला येथे डॉ. घोटगे व १८-१९ नोव्हेम्बर २०१० ला जोधपूर येथे डॉ. हगवणे यांचा सहभाग
- अंतराच्या पुढाकाराने २५ मेंढपाळांची राहुरी कृषी विद्यापीठास औषधी वनस्पती, चारा प्लॉट, शेळी व मेंढी विभागास माहिती भेट
- २७ ते ३० नोव्हेम्बर दरम्यान झालेल्या बन्नी पशु मेळाव्यात अंतराच्या कार्यकर्त्यांचा सहभाग
- ७-१० डिसेम्बर २०१० दरम्यान SERP येथील महिलांना लसीकरणासंबंधात डॉ. सचिन हगवणे यांचे मार्गदर्शन
- २३ ते २७ डिसेम्बर दरम्यान क्रपाविस, अल्वर येथे सहा वैदू व क्रपाविसचे कर्मचारी यांना डॉ. सचिन हगवणे यांनी अंतराची वनस्पती औषधी व उपचारांबद्दल मार्गदर्शन
- ३१ डिसेम्बर २०१०ला फ्लेम, पुणे यांनी आयोजित केलेल्या परिषदेमध्ये डॉ. नित्या घोटगे यांचा सहभाग
- २ फेब्रूवारी २०११ ला बीदर व्हेटेरीनरी कॉलेज येथे पशुवैद्यक डॉक्टरांकरता डॉ. पल्लवी कुरूंदकर व आशालता यांचे 'पशुंकरता प्रतिजैविकांचा वापर' या विषयावर सादरीकरण
- १२-१३ फेब्रूवारी २०११ला मिझेरिओरचे कारस्टन वूल्फ यांची अंतराला व अंतरा काम करत असलेल्या क्षेत्रातल्या मेंढपाळांबरोबर भेट

- २४–२५ फेब्रूवारी २०११ दरम्यान आयोजित केलेल्या WOTR – हवामान बदल या राष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. नित्या, अंतराचे कार्यकर्ते स्मिता व राजन यांचे अंतराच्या सेंद्रीय शेती प्रयोगाबद्दल सादरीकरण
- १–२ मार्च २०११ – खरवते येथे पाककला स्पर्धेत ३३ महिलांचा सहभाग. नरबे येथे कंपोस्ट ट्रेनिंग. सोलापूर भागामधून आलेल्या २६ महिला व पुरूष यांची अंतराने आयोजित केलेल्या पारंपरिक अन्नपदार्थ वापरुन केलेल्या पाककला स्पर्धेला उपस्थिती तसेच स्थानिक शेतकऱ्यांबरोबर सेंद्रीय शेतीविषयी चर्चा व गांडूळखताचे प्रात्यक्षिक. सर्वांकरता जयगड व गणपती पुळे येथे सहल.

...

**बुक-पोस्ट**

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : anthra.pune@gmail.com
वेबसाईट : www.anthra.org